॥ चतुर्पती कृष्ण अवधुत पंथ ॥

॥ कृष्ण महाराज धनी अवधुत ॥

॥ चतुर्पता अथर्वन् वेद उभा राहीन पोटी । निजरूप भुम्मा जागी करन सारी सृष्टी ॥

चतुर्पता
॥ अथर्वन् वेद ॥

॥ खंड १० : भाग ०१ ॥
॥ अरज ॥
॥ चतुर्पती च्या अर्जा ॥

शब्दार्थ, चरणार्थ निरसन स्पष्टीकरन सह

॥ चतुर्पती कृष्ण अवधुत पंथ ॥
चतुर्पता
॥ अथर्वन् वेद ॥
॥ कृष्ण महाराज धनी अवधुत ॥

www.chaturpata-atharvan-ved.com

Blank Page1032

॥ खंड १०/अर्ज भाग ०१ ॥

॥ अरज नं. ०१ ॥

॥ मुळावरची अरज ॥

॥ अवधुताची संगत घडली ॥

॥ अवधुताची संगत घडली । धनी आला माझा ।
तुम्हा नामी जडलो प्रतिपाळ करा माझा ॥
॥ आपण होवुन आले घरा । मज/आम्हा धरलं हाती ।
दवंडीच्या परमाणं वाणी । सांगतली यवगाची/जगाशी ॥
॥ व्दापर यवुग गेल्या वरं । कल यवग आहे ।
कल यवगाच्या गोष्टी सांगता । सत् यवग पाहावे ॥
॥ मोहरं यवुग, योगी गोष्टी । सांगत आहे ।
भावीक प्राणी असनं लक्ष्य । चरणा वर लावे ॥०४॥
॥ आधी भाकलं, मो-हं होणार । यवगा च्या गोष्टी ।
तिर पतीचा भ्रम सोडा । भजा चतुर्पती ॥ ..जळगाव दांड
॥ चतुरपतीची/चतुराईची, पदवी देवाची । वाणी ऐका हो ।
सतृ कृत्याच्या गोष्टी चांगल्या । विचारानं पहा हो ॥
॥ आदी गणाच्या कृपा मुखी । अगन्च आहे ।
जोकोणी निंदा करन त्याच्या । कुडीला दोष आहयें ॥
॥ सिदाई च्या मुखी रे बापा । अगनच आहे ।
जोकोणी नामी राहीनं त्याचा । करन संभाळ ॥ ..जळगाव दांड
॥ चत्रभुज महाराज धनी देव । भजनातं आहयं ।
नामीच राहा गडे हो देव । करतो/करनं संभाळ ॥०७॥

भजने :-

॥ अवधुत अनामत । करा महाराजाचं सुमरन । बहु आहे सुखः ॥

॥ अरज नं. ०२ ॥

॥ जुनी अरज ॥

॥ अवधुत माझा..। सावंग्याचा राजा ॥

॥ अवधुत माझा..। देव सावंग्याचा राजा । आहो राजा ।
भजनी आला..। मनमोहनं मुरली वाला ॥
॥ भजनी आला..। तुम्ही नका करू गलबला । आहो गलबला ।
बसली जागा..। आम्हाला भजन करू लागा ॥
॥ वाजवा टाळी..। एकच उठवा नामधुनी । नाम धुनी ।
लावली ज्योत..। देव उभे भजनातं ॥
॥ ज्योतीनं ज्योत उजेड । भरन देहीतं ।
उजळन रूप । या सुर्या च्या तेजात ॥ ०४॥
किंवाः- जैसे रूप, हे सुर्याचे तेज ॥ जळगाव दांडातील टुक

भजने :-- ॥ निर्वाणा ची ज्योत । उभी राहली सोयंम् ।
या ज्योतीनं । मदत केली पुर्ण ॥
॥ आहो या ज्योतीचा । उजेड आहे मजला सदोनित ॥

-: शब्दार्थ :-

अरज = विणवनी अर्ज, विनंतीपुर्वक विणवणी अर्ज सादर करने, ।
परमाणं = ..प्रमाणे, ...च्या प्रमाणे । मोहरं येवुन = समोर येवुन, पुढं येवुन.
गलबला = गोगांटा । धुळी = नामाचा धुर, नामाची धुनी,

॥ कृष्ण महाराज धनी अवधुत ॥